***Vidnyan Vari***

# विज्ञान वारीतून शास्त्रज्ञ निर्माण होतील!

## मराठी विज्ञान परिषदेच्या सभेत डॉ.भालचंद्र पाटील यांचा आशावाद



**जळगाव । प्रतिनिधी**

टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू बनविण्यासाठी विद्यार्थ्यांनी नेहमी ध्यास घेतला पाहिजे. शनिवारी विज्ञान वारी या उपक्रमात भाग घेतलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनीमधून निश्चितच कमीत कमी दोन सायंटिस्ट निर्माण होतील. तसेच या उपक्रम कार्यासाठी मी सदैव आपल्या पाठीशी उभा आहे व सर्व परी शंभर टक्के मदत करेल, असे आश्वासन डॉ. भालचंद्र पाटील यांनी दिले.

मराठी विज्ञान परिषद जळगावची जनरल सभा जळगाव पीपल्स बँकेच्या भवरलाल जैन सभागृहात मराठी विज्ञान परिषद अध्यक्ष भालचंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पाडली. त्याप्रसंगी ते बोलत होते. विशेष आमंत्रित प्रमुख पाहुणे म्हणून जागतिक कीर्तीचे केळी तज्ञ शास्त्रज्ञ जैन इरिगेशनचे डॉ. के.बी.पाटील, जळगाव पीपल्स बँकेचे अध्यक्ष अनिकेत पाटील आदी उपस्थित होते. यावेळी मराठी विज्ञान परिषदेचे सचिव प्रा. दिलीप भारंबे यांनी संपूर्ण वर्षात घेतलेल्या मराठी विज्ञान परिषदेच्या इतिवृत्ताचे वाचंन केले. संचालक प्रा.शशिकांत नेहेते यांनी आर्थिक इतिवृत्ताचे वाचन केले. संचालक प्रा.आर.बी.देशमुख ऐनवेळी उपस्थित झालेल्या विषयांवर चर्चा केली. सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. यावेळी बहुसंख्य सभासद उपस्थित होते. प्रमुख अतिथी डॉ.के.बी.पाटील, अनिकेत पाटील यांच्या हस्ते विज्ञान वारी या उपक्रमात यशस्वी भाग घेतलेल्या नूतन मराठा महाविद्यालयाच्या वीस विद्यार्थी विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. तसेच यंग सायंटिस्ट म्हणून प्रा.डॉ.आर. जी.बावणे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. के.बी .पाटील यांनी रिसर्च ओरिएंटेड दृष्टिकोन कसा असला पाहिजे तसेच जागतिक लेवलला पर्यावरण विषयी काय काळजी घेतली जाते व त्या संदर्भात काय उपाय केले आहेत यावेळी आपल्याला आलेल्या जागतिक प्रवासादरम्यान त्यांनी अनुभव कथन केले. तसेच पीपल्स बँकेचे चेअरमन अनिकेत पाटील यांनी विद्यार्थी विद्यार्थिनीमधून निश्चितच कमीत कमी दोन सायंटिस्ट निर्माण होतील,असा आशवाद त्यांनी व्यक्त केला. आभार ज्येष्ठ संचालक प्रा.शशिकांत नेहेते यांनी मानले.यशस्वीतेसाठी संचालक प्रा.रवींद्र सिंग पाटील, सचिव प्रा.दिलीप भारंबे, नूतन मराठा महाविद्यालयाच्या विज्ञान असोसिएशनचे अध्यक्ष प्रा.आर.बी.देशमुख यांनी परिश्रम घेतले.